## प्रेसनोट दि. १९.०८.२०२०

श्री. राम दगडू शिकलगार वय ४५ वर्ष कनिष्ठ लिपिक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली यांना ५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी त्यांचे मुलाचे जन्माचा दाखल्यावरील दुरूस्ती करून जन्माचा दाखला मिळण्याकरिता जन्म मृत्यू नोंदणी विभाग, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली या ठिकाणी अर्ज केला होता. सदरचा जन्माचा दाखला दुरूस्त करून देणे कामी श्री. शिकलगार क्लार्क यांनी तक्रारदार यांचेकडे ५००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी आज दि.१९.०८.२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक १९.०८.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. शिकलगार क्लार्क यांनी तक्रारदार यांच्याकडे ५००/- रूपये लाचेची मागणी करून लागलीच घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच जन्म मृत्यू नोंदणी विभाग, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली या ठिकाणी सापळा लावला असता श्री. राम दगडू शिकलगार वय ४५ वर्ष कनिष्ठ लिपिक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ५००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री. राम दगडू शिकलगार वय ४५ वर्ष कनिष्ठ लिपिक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक,श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी अविनाश सागर, सुहेल मुल्ला, रविंद्र धुमाळ, संजय संकपाळ, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, धनंजय खाडे,राधिका माने, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in